दैनिक जनप्रवास

● शनिवार, दि. २५ जुलै २०२६

# विवेकानंद महाविद्यालयात नवोदितांचे स्वागत

जनप्रवास : कोल्हापूर

विवेकानंद महाविद्यालयात वाणिज्य विभागात प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन (पदवी आरंभ) प्रोग्रॅम उत्साहपूर्ण वातावरणात झाला. नवागत विद्यार्थ्यांचे विवेकानंद परिवारात स्वागत करून त्यांना महाविद्यालयाची कार्यपद्धती, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम, ग्रंथालय, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, विद्यार्थी विकास विभाग तसेच करिअर मार्गदर्शन व कौशल्य विकासाच्या संधी यांची सविस्तर माहिती दिली.




अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. स्वागत आणि प्रास्ताविक प्रा. सनी काळे यांनी केले. सूत्रसंचालन समृद्धी चौगुलेने केले तर आभार प्रदर्शन डॉ. आशा सावंत यांनी मानले. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. अक्षय रेडेकर, डॉ. योगेश माने, डॉ. उमेश दबडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सिद्धार्थ कट्टीमनी, डॉ. डी. आर. तुपे, डॉ. ए. एस. महात, डॉ. संदीप पाटील, ग्रंथपाल डॉ. नीता पाटील, डॉ. विकास जाधव होते.